# "MARATHAKALIN KONKAN 1656 TO 1818"

A Project Submitted to,

## VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

For the Degree of Bachelor of Arts

in

**History**

By

**Mr. Akash Kundalik Mang**

Under the Guidance of

**Dr. S. R. Kattimani**

Head Dept. of History, Vivekanand College, Kolhapur

2022



Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकल्पाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| | मराठा कालीन कोकण (इ.स. १६५६ ते १८१८) | |
| 1. | प्रस्तावना | 3 |
| 2. | उद्दिष्टे | 4 |
| 3. | संशोधन पद्धती | 5 |
| 4. | गृहितके | 5 |
| 5. | प्राचीन व मध्ययुगीन कोकण | 7 |
| 6. | कोकण : व्युत्पत्ती व प्राचीन काळातील व्याप्ती | 9 |
| 7. | कोकणचे भूवर्णन | 13 |
| 8. | प्राचीन कोकणचा इतिहास | 15 |
| 11. | संदर्भ ग्रंथ | 23 |
| 12. | प्रतिज्ञापत्र | 24 |
| 13. | प्रमाणपत्र | 25 |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner


## • प्रस्तावना :

"मराठाकालीन कोकण सन १६५६ ते १८१८" हा शोध प्रबंध मी शिवाजी विद्यापीठास पीएच्.डी. पदवी करिता सादर केलेला आहे. हा विषय निवडण्याचे प्रमुख कारण म्हणजे कोकणच्या राजकीय, सामाजिक तसेच आर्थिक विषयावर इ.स. पूर्व काळाच्या संदर्भात संशोधन झालेले आहे. पण सन १६५६ ते १८१८ या कालखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीवर फारसे लेखण झालेले नाही. तसेच कोकणातील विविध बंदरे व तेथील व्यापार याच्यावरही फारसे लिहिले गेले नाही. तसे ते होणे आवश्यक असल्याने (वाटल्याने) मी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. कोकण शब्दाच्या व्युत्पतीपासून प्राचीन काळातील कोकणातील विविध राजसत्ता, कोकणची भौगोलिक रचना इ. चा आढावा घेतला आहे तसेच तत्कालिन परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने, व्यापार व व्यापारी केंद्रे यांची थोडक्यात माहिती दिली आहे. शिवाय मध्ययुगीन कोकणातील विविध सत्ता, त्यांचा सत्तासंघर्ष यांचीही थोडक्यात माहिती दिली आहे. शिवकालीन कोकणची माहिती दिली असून छ. शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी कोकण प्रदेशाचा कसा महत्वपूर्ण उपयोग झाला, तसेच स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नात त्यांना स्वकियांबरोबर तसेच परकीय सत्तांबरोबरही कसा संघर्ष करावा लागला याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner



- **उद्दिष्टे :**

- मराठा कालीन कोकणाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
- मराठा कालीन कोकणाचे जतन व संवर्धन अभ्यासणे.
- मराठा कालीन कोकणाचा आढावा घेणे.
- कोकणातील हवामानाचा अभ्यास.
- कोकणातील पर्यटनाच्या दृष्टिकोनातून स्थळास भेट देऊन पूर्व आढावा देणे.

VIVEKANAND COLLEGE KOL... ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

## • संशोधन पद्धती :

१) वर्णनात्मक संशोधन पद्धती.

२) ऐतिहासीक संशोधन पद्धती.

३) सर्वेक्षणात्मक पद्धत

- संशोधन पद्धतीची साधने:

१) प्रथम व दुय्यम दर्जाच्या साधनांच्या आधारे प्रबंध तयार करणे.

२) स्थळांना भेटी

३)तत्कालीन कागदपत्रांचा अभ्यास करणे.


## • गृहितके :

- कोकण हे ऐतिहासिक स्थळ म्हणून ओळखले जाते.
- कोकणातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून दीर्घकाळ साठी उपयोगी आहे.
- ऐतिहासिक स्थळे जतन व संवर्धन करण्यासाठी ही स्थळे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची भर टाकते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



Scanned with CamScanner

- ## प्राचीन व मध्ययुगीन कोकण:

महाराष्ट्राच्या प्रदेशाचे सहयाद्रीच्या डोंगर रांगामुळे दोन विभाग पडलेले आहेत. त्यापैकी पश्चिमेच्या विभागाला कोकण म्हणतात. तर पूर्वेकडिल विभागाला 'देश' असे संबोधले जाते. प्रामुख्याने महाराष्ट्र किनारपट्टी व आसपासच्या प्रदेशाचा समावेश कोकणात होतो. सहयाद्रिच्या रांगामुळे विभाजन होऊनही कोकण हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनून गेलेला आहे. कोकणचा निसर्ग हा नेहमीच पर्यटकांना व निसर्गप्रेमींना भुरळ घालीत असतो. तेथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाला मिळालेली देणगी आहे.कोकणच्या या प्रदेशावर निरनिराळ्या राजघराण्यांनी राज्य केलेले आढळते. प्राचीन काळात शिलाहार, मौर्य, सातवाहन, त्रैकुटक, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य इत्यादी राजघराण्यांनी राज्य केले. तर मध्ययुगीन काळात कोकणवर देवगिरीचे यादव, बहामनी राजे, मुघल, आदिलशाही व निजामशाही या सत्तांचे राज्य होते. तर १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोकणावर मराठी सत्तेचा अंमल निर्माण झालेला दिसून येतो. महाराष्ट्राच्या भूप्रदेशावर मराठयांची सत्ता निर्माण होणे ही घटना एकमेवाद्वितीय व अपूर्व अशीच होती. तोरणा किल्ला घेऊन शुभारंभ झालेली मराठ्यांची ही सत्ता पुढील काळात दक्षिणेला जिंजीपर्यंत व उत्तरेला अटकेपर्यंत दौडत गेलेली दिसते. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या इतिहासामुळेच मराठ्यांना एक वेगळे अस्तित्व निर्माण झाले. रजपूत, शिख जमातीप्रमाणेच स्वाभिमानी लढवय्ये, शुर व स्वतःचे राज्य निर्माण करणारे मराठे म्हणून इतिहासात

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

त्यांची नोंद झाली. देशाप्रमाणेच मराठ्यांचे राज्य कोकणावरही होते. कोकण प्रदेशावर मराठी सत्तेचा अम्मल जवळजवळ दिडशे वर्ष होता. त्यामुळे राजकीय वर्चस्वाबरोबरच येथील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जडण घडणीत मराठी सत्तेचे योगदान महत्वपूर्ण आहे. आपण या ठिकाणी मराठे कालीन कोकणचा' अभ्यास करीत असताना त्याअगोदर कोकणची तोंड ओळख होणे गरजेचे आहे. त्यामध्ये आपण 'कोकण' नांवाची उत्पत्ती, कोकणचे भूवर्णन, व मराठयाच्या अगोदर होऊन गेलेल्या राजघराण्यांची थोडक्यात माहिती घेणार आहोत.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

## • कोकण : व्युत्पत्ती व प्राचीन काळातील व्याप्ती :

'कोकण' शब्दाची उत्पत्ती कशी झाली असावी किंवा याप्रदेशाला 'कोकण' हे नांव कधी पासून दिले गेले. याबद्दल अभ्यासकामध्ये एकवाक्यता आढळत नाही. निरनिराळे अभ्यासक व इतिहासकार यांनी आपणास मिळालेल्या साधनांचा अभ्यास करून 'कोकण' या शब्दाच्या उत्पत्तीबद्दल निरनिराळी मते मांडली आहेत त्यातील कांही मतांचा परामर्ष आपण घेऊ. लक्ष्मण गोविंद घाणेकर यांनी सन १९३३ मध्ये प्राचीन द्रविड या नांवाचे पुस्तक प्रकाशित केले असून त्याला परिशिष्ट म्हणून एक 'कोकण आणि चित्पावन' या मथळयाचा इंग्रजी निबंध जोडला आहे. त्यात ते कोकण या शब्दाची व्युत्पत्ती अशी देतात की, "परशुरामाने सर्व पृथ्वीचे दान केल्यावर त्यास आपल्याला रहाण्यासाठी समुद्रास हटवावे लागले. परशुरामाच्या आईचे नांव रेणुका अथवा कोकणादेवी होते व त्याच नांवावरुन या प्रदेशाला कोकण हे नांव पडले. प्रा. पांडुरंग वामन काणे यांच्या मते प्राचीन ग्रंथात कोकण असे नांव न येता कुंकण किंवा कुकुण असे नांव येते. चि. वि. वैद्य यांच्या मते कोकण शब्दाचा उल्लेख महाभारत काळापासून असावा त्यासाठी ते महाभारतातील भीष्मपर्व अध्याय मधील पुढील प्रमाणे श्लोक देतात.

अथापरेजन पदः दक्षिणा भरत वर्षम |

द्रविडाः केरलः प्राच्या, मषिकाः वनवासिका ॥१॥

कर्नाटका महिषका विकत्था मूषकास्त था।

कौकुट्टका स्तधा चोलाः कोकणा माल वास्त था ||२||

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

या श्लोकात दक्षिण भारतातील विविध प्रदेशांची नांवे आली आहेत. ती म्हणजे द्रविड, केरळ, प्राच्य, वनवासिक, कर्नाटक, कौकुटकाचौला व कोकण अशी आहेत. यावरून महाभारत काळात कोकण शब्द आस्तित्वात असावा असे ते म्हणतात. तसेच वैद्य यांच्या मते कोकण हे नाव कोणकु (डोंगराळ प्रदेश) या शब्दावरुन अन् प्रत्यय लागून निघालेले असावे. थोडक्यात त्यांच्या मते कोकण किंवा कोणकु या शब्दाचा वापर महाभारत काळापासून असावा. जमदग्नीचा पुत्र परशुराम याच्यासाठी समुद्र देवतेने समुद्र किना-यावर शूर्पारक नांवाच्या प्रदेशाची निर्मिती केली. शूर्पारक हे देशाचे, जिल्हयाचे त्याचप्रमाणे शहराचे नांव होते. पाली वाङमयात या शहराचा सुपाःश किंवा सुपारक असा उल्लेख आहे. पेरिप्लसने त्याचा उल्लेख सुपारा असा केला आहे. तर अल्बेरुनी त्याचा उल्लेख 'सुबारा' असा केला आहे. हे शहर म्हणजे ठाणे जिल्हयातील वसईच्या उत्तरेस ९ कि.मी. अंतरावर असणारे सोपारा होय.

प्रो. हेमचंद्र रायचौधरी यांच्या मते इ.स.च्या ६ व्या शतकापासून पश्चिम घाट व समुद्र किना-याच्या मधील प्रदेशाला कोकण विषय म्हणण्यात येऊ लागले. चालुक्य राजा मंगलेश (इ.स. ५९७ ते ६०९) याच्या दानपत्रात कुंडीवाटक या कोकण विषयातील गावाचा उल्लेख करण्यात आला आहे. हे गांव रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील कुंडी नांवाचे गाव होय. सुरुवातीच्या काळात कोकणाचा प्रदेश अपरांताहून वेगळा मानण्यात येत असावा. अपरांत म्हणजे ठाणे जिल्हयाचा प्रदेश. कोकण आणि अपरांत असे दोन वेगळे विभाग असावेत असे बृहद्संहितेतील पुराव्यावरुन वाटते. मध्ययुगीन कालखंडातील 'शक्तीसंगम तंत्र' यामध्ये देखील कोकणचा उल्लेख समुद्र किना-यावर असणारा हा प्रदेश असून पश्चिम घाटापासून कोटीश (कोटीस) नावाच्या जिल्हयापर्यंत याचा विस्तार होता.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

कोटीश म्हणजेच 'गोकर्ण' येथे असणारे कोटितीर्थ असा उल्लेख असावा. कोंकण हा शब्द कुंकण, कुणकुण आणि कोकंण या प्रकारे देखील प्राचीन कालखंडात वापरला जात असे. इ.स. १०३० मध्ये अल्बेरुनी या प्रवाशाने या प्रदेशाचा उल्लेख कुणकुण असा केला आहे. तसेच या प्रदेशाची राजधानी ठाणा असल्याचा उल्लेख केला आहे. कोकु या शब्दाचा अर्थ उंच सखल जमीन असा होतो.

'फ्लीट' यांनी डॉ. गुडर्ड यांच्या मल्याळम् डिक्शनरीतील कोकणच्या सात विभागांचा उल्लेख केलेला आहे.

करातम्च् विरातम्च् माराटम् कोकणम् तथा ।

हव्यगंम् तौलवम्, चौ केरलम चैटी सप्तकम् ॥

वरील श्लोकामध्ये कोकणचे सात विभाग मानण्यात आले आहेत. काराट बहुधा सातारा जिल्हयातील कराड, विराट म्हणजे धारवाड जिल्हयातील हनगल, माराट म्हणजे मराठयांचा प्रदेश, हव्यंग म्हणजे उत्तर कॅनरा तौलुव म्हणजे दक्षिण कॅनरा आणि केरळची किनारपट्टी होय. शके ९४६ च्या मिरज ताम्रपटात सात कोकणचा स्पष्ट उल्लेख आहे. सात कोकणांच्या यादीत कुणकुण हे निराळे असून कोकण देशाची व्याप्ती केरळ पर्यंत नाही असे श्री. चि. वि. वैद्य यांचे मत आहे. ते पुढे म्हणतात, सप्त कोकण याचा अर्थ कोकणादी सप्त असा केला पाहिजे. पंच गौड अथवा पंच द्रविड याचा अर्थ गोडादी पंच किंवा द्रविडादी पंच असाच होता. अर्थात द्रविड देशाची व्याप्ती जशी गुजराथे पर्यंत जात नाही. त्याच प्रमाणे सप्त कोकण म्हणजे कांकणादी सप्त कोकण हे सर्वात उत्तरेकडेच, तर अल्बेरुनी त्याचा उल्लेख 'सुबारा' असा केला आहे. हे शहर म्हणजे ठाणे जिल्हयातील वसईच्या उत्तरेस ९ कि.मी. अंतरावर असणारे सोपारा होय.

VIVEKANAND COLLEGE KOL
ESTD
JUNE
1964



Scanned with CamScanner

प्रो. हेमचंद्र रायचौधरी यांच्या मते इ.स.च्या ६ व्या शतकापासून पश्चिम घाट व समुद्र किना-याच्या मधील प्रदेशाला कोकण विषय म्हणण्यात येऊ लागले. चालुक्य राजा मंगलेश (इ.स. ५९७ ते ६०९) याच्या दानपत्रात कुंडीवाटक या कोकण विषयातील गावाचा उल्लेख करण्यात आला आहे. हे गांव रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील कुंडी नांवाचे गाव होय. सुरुवातीच्या काळात कोकणाचा प्रदेश अपरांताहून वेगळा मानण्यात येत असावा. अपरांत म्हणजे ठाणे जिल्हयाचा प्रदेश. कोकण आणि अपरांत असे दोन वेगळे विभाग असावेत असे बृहद्संहितेतील पुराव्यावरुन वाटते. मध्ययुगीन कालखंडातील 'शक्तीसंगम तंत्र' यामध्ये देखील कोकणचा उल्लेख समुद्र किना-यावर असणारा हा प्रदेश असून पश्चिम घाटापासून कोटीश (कोटीस) नावाच्या जिल्हयापर्यंत याचा विस्तार होता. कोटीश म्हणजेच 'गोकर्ण' येथे असणारे कोटितीर्थ असा उल्लेख असावा.

कोंकण हा शब्द कुंकण, कुणकुण आणि कोकंण या प्रकारे देखील प्राचीन कालखंडात वापरला जात असे. इ.स. १०३० मध्ये अल्बेरुनी या प्रवाशाने या प्रदेशाचा उल्लेख कुणकुण असा केला आहे. तसेच या प्रदेशाची राजधानी ठाणा असल्याचा उल्लेख केला आहे. कोकु या शब्दाचा अर्थ उंच सखल जमीन असा होतो.

'फ्लीट' यांनी डॉ. गुडर्ड यांच्या मल्याळम् डिक्शनरीतील कोकणच्या सात विभागांचा उल्लेख केलेला आहे.

करातम्च् विरातम्च् माराटम् कोकणम् तथा ।

हव्यगंम् तौलवम्, चौ केरलम चैटी सप्तकम् ॥

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

वरील श्लोकामध्ये कोकणचे सात विभाग मानण्यात आले आहेत. काराट बहुधा सातारा जिल्हयातील कराड, विराट म्हणजे धारवाड जिल्हयातील हनगल, माराट म्हणजे मराठयांचा प्रदेश, हव्यंग म्हणजे उत्तर कॅनरा तौलुव म्हणजे दक्षिण कॅनरा आणि केरळची किनारपट्टी होय. शके ९४६ च्या मिरज ताम्रपटात सात कोकणचा स्पष्ट उल्लेख आहे. सात कोकणांच्या यादीत कुणकुण हे निराळे असून कोकण देशाची व्याप्ती केरळ पर्यंत नाही असे श्री. चि. वि. वैद्य यांचे मत आहे. ते पुढे म्हणतात, सप्त कोकण याचा अर्थ कोकणादी सप्त असा केला पाहिजे. पंच गौड अथवा पंच द्रविड याचा अर्थ गोडादी पंच किंवा द्रविडादी पंच असाच होता. अर्थात द्रविड देशाची व्याप्ती जशी गुजराथे पर्यंत जात नाही. त्याच प्रमाणे सप्त कोकण म्हणजे कांकणादी सप्त कोकण हे सर्वात उत्तरेकडेच उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे 'पेरिप्लस ऑफ युरेथ्रेइमसी' या अनामिक लेखकाच्या वृतांतात देखील कोकणचे उल्लेख सापडतात. प्राचीन वांङमयात कोकणचे उत्तर कोकण (लारिका) व दक्षिण कोकण (आरिका) असे उल्लेख करण्यात येत होते.

- ## कोकणचे भूवर्णन :

महाराष्ट्राच्या पश्चिम किनार पट्टीला कोकण अशी संज्ञा आहे. उत्तरेकडील दमण गंगा नदीपासून दक्षिणेतील तेरेखोल खाडीपर्यंत असलेल्या चिंचोळ्या भू प्रदेशाला कोकण किनारपट्टी म्हणतात. या किनारपट्टीची उत्तर दक्षिण लांबी ७२० कि.मी. व रूंदी ४० ते ८० कि. मी. आहे. कोकणच्या उत्तर सीमेला दमणगंगा नदी आहे तर दक्षिण सीमेला काळी नदी आहे. दमण ते गोव्यामधील समुद्र किनारपट्टी १५.५ अंक्षांश ते २०.५ उत्तर अक्षांश आणि ७२.८ ते ७३.८ पूर्व अक्षांश या क्षेत्रात

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

पसरलेली आहे. कोकणचे प्रामुख्याने उत्तर कोकण व दक्षिण कोकण असे दोन विभाग पडलेले दिसतात. उत्तर कोकणात ठाणे जिल्हा व बृहन्मुंबई या परिसराचा तर दक्षिण कोकणात कुलाबा (रायगड) व रत्नागिरी जिल्हयांचा समावेश होतो. दक्षिण कोकणात सहयाद्री पर्वताच्या उपरांगा (फाटे) जवळ जवळ समुद्रापर्यंत पसरलेले दिसतात. उत्तर कोकणात मात्र वालुकामय किनाऱ्याला समांतर सलग गाळ जमिनीचा पट्टा आहे. त्याच्या पूर्वेस डोंगराची रांग व तिच्या पलिकडे वैतरणा नदीचे खोरे आहे. कोकण प्रदेशात अनेक लहान मोठया नदया आहेत. त्यातील बऱ्याच नदया सहयाद्री पर्वतात उगम पावल्या आहेत. दमण गंगेपासून दक्षिणेस वैतरणा, तानसा, उल्हास कुंडलिका, भोगावती, सावित्री गायत्री, वशिष्ठी, शास्त्री, मांडवी, जुवारी, व कारवार जवळील काळी नदी इत्यादी नदया आहेत. सहयाद्री पर्वतापासून समुद्रकिनारपट्टी जवळच असल्याने कोकणातील नदयांची लांबी कमी आहे. या प्रदेशात पावसाचे प्रमाण चांगले असल्याने या नदयां पावसाळयात दुथडी भरून वाहतात तर उन्हाळ्यात कोरडया पडतात. कोकणच्या पूर्वेस सहयाद्री पर्वताच्या रांगा असून तेथे अनेक किल्ले आहेत. व घनदाट जंगल आहे. या किल्यांच्या आश्रयानेच छ. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याची स्थापना करून पुढील काळात स्वराज्याचा विस्तार ही केला. कोकण आणि देश या प्रदेशांना जोडण्यासाठी सहयाद्रिच्या पर्वतरांगातून अनेक रस्ते तयार करण्यात आले आहेत. या डोंगरातील रस्त्यांनाच घाट असे म्हणतात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner




## • प्राचीन कोकणचा इतिहास :

प्राचीन ग्रंथात इ.स. पूर्व चौथ्या शतकापासून कोकणचा इतिहास आढळतो. महाभारत, हरिवंश, विष्णूपुराण, बृहत्संहिता, राजतरंगिणी, पेरिप्लस इ. ग्रंथ, चालुक्याचे शिलालेख, प्लीनी, टॉलेमी हुएनत्संग, इब्नबतुता अल्बेरुनी यांच्या प्रवास वृत्तांतात कोकणचा उल्लेख आढळतो. इ.स. पूर्व पांचव्या शतकापासून बॅबिलोनियन रोम इ. शी भडोच, चेऊल, वनवासी, सोपारा, बालेपाटण (खारेपाटण) कल्याण या व्यापारी केंद्राचा संबंध होता. कोकणातील शिलालेख व ताम्रपटावरुन असे दिसते की, एकेकाळी साष्टी व मुंबईच्या दक्षिणेकडील भागात बौंध्दांचे वर्चस्व होते. इ.स. पूर्व दुस-या व तिस-या शतकात येथे मौर्य राजांचा अंमल असल्याचे दिसून येते सम्राट अशोकाच्या (इ. स. पूर्व २७३ ते इ.स. पूर्व

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

२३२) काळात मौर्याची सत्ता कोकणात होती. व सोपारा ही अशोकाची राजधानी होती. अशोकाच्या मृत्युनंतर मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासास सुरूवात झाली. मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर कोकणात सातवाहन राजाची सत्ता आली. कण्व राजा सुशर्मा याची हत्या करणारा सिमूक आंध्र हाच सातवाहन घराण्यातील पहिला राजा होता. तो पूर्वी कण्वाचा सामंत किंवा अमात्य असावा. पुराणात आध्रांचा उल्लेख आधंभ्रत्य (नोकर) असा आला आहे. त्यांनी दक्षिणेकडे सत्ता संपादन केली. दक्षिण भारताचे सम्राट म्हणून या घराण्यातील राजांनी सुमारे तीनशे वर्षे राज्य केले. 'सातवाहन' सत्तेच्या व्युत्पत्ती संबधी निश्चीत स्वरूपाची माहिती उपलब्ध होत नाही परंतु एक मात्र खरे की, सातवाहन ही दक्षिण भारतातील एक प्रभावी सत्ता होती. नाशिक येथील शिलालेखात आंध्रवंशीय ब्राम्हण होते असे म्हटले आहे. ऐतरेय ब्राम्हणानुसार कृष्णा व गोदावरी नदयांमधील प्रदेशात ते रहात होते. तेंव्हापासून त्यांना 'आंध्र' असे नामाभिधान प्राप्त झाले. चंद्रगुप्त व अशोक या मौर्य राजांच्या काळात आधांनी दक्षिणेत प्रचंड सैन्यबळाच्या जोरावर सत्ता संपादन केली होती. जोपर्यंत मौर्य सम्राट प्रभावी होते. तोपर्यंत त्यांनी मौर्याचे मांडलिकत्व स्वीकारले होते. परंतु मौर्यांच्या पतनानंतर त्यांनी मौर्याचे मांडलिकत्व झुगारून देऊन दक्षिणेत स्वतंत्रपणे तीनशे वर्षे राज्य केले. त्यांची सत्ता पूर्वेकडून पश्चिमेकडे वाढत गेली व महाराष्ट्रात प्रतिष्ठाण (पैठण) ही त्यांची राजधानी होती. महाराष्ट्रात आल्यानंतरच आधांना 'सातवाहन' असे संबोधण्यात येऊ लागले. सातवहान राजांची नावे व त्याचा कालखंड यासंबंधी पुरेशी माहिती मिळत नाही. त्याबद्दल इतिहासकारात मतभेद आढळतात.

सिमुक या संस्थापक राजाने इ.स. पूर्व २३० च्या दरम्यान सत्ता मिळवली व तो इ.स. २१३ पर्यंत राज्य करीत होता. त्याच्या नंतर त्याचा भाऊ

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

कान्हा किंवा कृष्ण हा राजा झाला. त्याचे राज्य महाराष्ट्रावर होते असे कांही इतिहासकारांचे म्हणणे आहे. तर काही इतिहासकारांच्या मते इसवी सनाच्या पहिल्या शतकात सातवाहनांनी दक्षिणेत स्वतंत्र राज्य स्थापन केले. कान्हा नंतर सिमूकाचा मुलगा पहिला सातकर्णी (इ.स. पूर्व १९४ ते इ.स. पूर्व १८४) हा राजा झाला. तो अतिशय पराक्रमी होता. त्याची सत्ता महाराष्ट्रात असावी. कारण त्याने महाराष्ट्रातील महारथी मणकिथर याची कन्या नागनिका हिच्याशी विवाह केला होता. दक्षिणपथाचा बराच प्रदेश त्याच्या वर्चस्वाखाली होता. त्याने स्वतःला 'दक्षिणपथपती' व 'अप्रतिहतचक्र' असा किताब धारण केला होता. त्याने वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले होते. त्यांच्यानंतर पुर्नोसंग, स्कन्धस्तंभी हे सातवाहनाचे राजे होऊन गेले. त्या प्रत्येकाचा कालखंड १८ वर्षाचा होता. दुसरा सातकर्णी या सातवाहन राजाची कारकिर्द दिर्घकाळ व प्रभावी होती. त्याचे कोकणावर राज्य होते. परंतु त्याच्याबद्दल फारशी माहिती मिळत नाही. त्याच्यानंतर राजा अपीलक सत्तेवर आला. त्याची सत्ता मध्य प्रांतापर्यंत होती. कारण मध्यप्रांतात त्याची तांब्याची नाणी सापडली आहेत. सातवाहन घराण्यातील सतरावा 'राजा हाल' पहिल्या शतकाच्या अखेरीस गादीवर आला. 'गाथा सप्रशती' हा ग्रंथ त्यानेच रचला. महाराष्ट्रात निर्माण झालेला पहिला ग्रंथ म्हणूनही त्याचे वेगळे महत्व आहे. याची सत्ताही महाराष्ट्रावर होती. त्यांच्या काळातच शकांची दक्षिणेवर आक्रमणे झाली. त्यामुळे सातवाहनांच्या सत्तेला पायबंद बसला. गौतमी पुत्र सातकर्णी (इ.स. ८० ते इ.स. १०४ ) यास सातवाहन घराण्यातील कर्तबगार राजा मानले जाते. तो या घराण्यातील २३ वा राजा होता. व त्याची कारकिर्द २४ वर्षांची होती. त्याने सातवाहन साम्राज्याची पुर्नः स्थापना केली व पश्चिम महाराष्ट्राला शकक्षत्रपांच्या जोखडातून मुक्त केले. त्याने महाराष्ट्र, कोकण, नर्मदा खोरे सौराष्ट्र, माळवा पश्चिम

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

राजपुताणा इ. प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. कोकणावर गौतमीपुत्राची सत्ता होती. हे स्पष्टपणे दिसून येते. त्याची नाणी ठाणे जिल्हयातील सोपारा येथे सापडली आहेत. त्याची आई गौतमी बलश्री हिच्या शिलालेखात सातकर्णीच्या साम्राज्यात असलेल्या प्रदेशांची नांवे दिली आहेत. गौतमी हे मातृनाम लावणारा हा पहिलाच सातवाहन राजा होता. तो विद्वांनांचा आश्रयदाता व प्रजाहित दक्ष राजा होता. गौतमीपुत्र श्री सातकर्णी नंतर त्याचा मुलगा राजा वशिष्टीपुत्र श्री पुलुमायी हा गादीवर आला. त्याने आपले साम्राज्य आंध्रप्रदेश व पूर्व किनारपट्टीपर्यंत वाढविले. कोकणात देखील त्याची सत्ता होती. पुलुमायी नंतर सातवाहन राज्यसत्तेला उतरती कळा लागली. त्याच्यानंतर सत्तेवर आलेला वशिष्टीपुत्र सातकर्णी (इ.स. १२४ ते १५०) याच्या काळात क्षत्रपांनी - गुजरात, सौराष्ट्र, माळवा, आंध्र हे प्रदेश परत मिळविले व सातवहानांची पिछेहाट झाली. राजा यज्ञश्री याने सातवाहन सत्तेला सावरण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या मृत्युनंतर पुन्हा या घराण्याची उतरती कळा चालू झाली. कोकणातील सातवाहनांची सत्ता याच काळ संपुष्टात आली.

सातवाहन काळात कोकणाचा परदेशासी (विशेषत: रोम बरोबर) व्यापारी संबंध प्रस्थापित झाला होता. चौल, कल्याण, सोपारा ही बंदरे या काळात भरभराटीस आली होती. गौतमीपुत्र सातकर्णी, 'त्रीसमुद्रतोयपितवाहन' अशी उपाधी लावून घेत असे. यज्ञश्री सातकर्णीच्या नाण्यावर जहाजाची चित्रे आढळतात यावरून इ.स. पूर्व पहिल्या शतकात सातवाहन राज्यकर्त्यांची सत्ता सागरांवरही होती हे स्पष्ट होते. इ. सनाच्या चौथ्या शतकात कोकणावर त्रैकुटकांची देखील सत्ता निर्माण झाली. त्याचप्रमाणे इ.स. ३७५ ते ४०० या कालखंडात राष्ट्रकुटांच्या सुरुवातीच्या वंशजांचा देखील ताबा कोकणच्या कांही परिसरात निर्माण झाला. त्रैकुटक राजा दारसेन व त्याचा पुत्र व्याघ्रसेन यांची सत्ता कोकण, घाट व दक्षिण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

गुजराथ या प्रदेशावर होती. त्रैकुटांच्या कालखंडात महायान बौध्द धर्माचा या परिसरात प्रचार झाला होता. त्यानंतर कोकणच्या परिसरावर वाकाटकांची सत्ता निर्माण झाली. वाकाटकांचा कालखंड इ.स. २५० ते ५५० असा मानला जातो. वाकाटक राणीच्या (चंद्रगुप्त दुसरा याची कन्या) पुणा ताम्रपटावरुन वाकाटक हे केवळ विदर्भाचेच राजे नसून पश्चिम महाराष्ट्रात देखील त्यांच्या सत्तेचा विस्तार झाला होता हे स्पष्ट होते. इ. सनाच्या तिस-या शतकांपासून ते सहाव्या शतकापर्यंत दक्षिण भारतात ज्या विविध राजकीय सत्ता होत्या त्यामध्यें वाकटकांची सत्ताही अत्यंत प्रभावी होती. सहाव्या शतकाच्या मध्यापासून कोकणावर नळ व मौर्य घराण्याची सत्ता निर्माण झाली. (इ.स. ५०० नंतर) पहिला चालुक्य राजा किर्तीवर्मन याने कोकणातील नळराजे व मौर्य राजे यांचा पराभव केला. किर्ती वर्मनचा नातू पुलकेशी याने (इ.स. ६१० ते ६४०) कोकणावर, तेथील मौर्यांचा पराभव करुन आपली सत्ता निर्माण केली. ठाणे जिल्हयातील उत्तर भागात वाडा या ठिकाणी असलेल्या शिलालेखात यावेळी सकेतुवर्मा नांवाचा मौर्य राजा कोकणावर राज्य करीत असल्याचा उल्लेख आहे. यानंतर कोकणावर स्वतःची सत्ता स्थापन करणारे घराणे म्हणजे बदामीचे चालुक्य होय. यांचा कालखंड इ.स. ५५० जे ७५४ असा मानण्यात येतो. पण नंतर देखील कांही कालखंड चालुक्यांचे अस्तित्व होते. हे चालुक्य उत्तर कोकणावर साधारणत: इ.स. ८१० पर्यंत राज्य करीत होते. चालुक्य राजा विक्रमादित्याने नाशिक जिल्हा व कोकणचा उत्तर भाग यावर हरिश्चंद्रवंशी स्वामीचंद्राची नेमणूक केली होती. याच विक्रमादित्याने अंजनेरी जवळील देवालयाकरिता कोकणातील कांही प्रदेशावर कर बसविल्याचा उल्लेख अंजनेरी ताम्रपटात आहे. चालुक्य राजा पुलकेशी दुसरा यांच्या कालखंडात हुएनत्संग हा चिनी प्रवासी कोकणात आला होता. सहाव्या शतकात अरब प्रवाशी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

देखील कोकणात येऊ लागले. त्यांनी कोकणाला केंकम, कंकण, कोकण इ. नांवे दिली. सहाव्या शतकाच्या अखेरीस 'कॉस्मॉस इंडिका प्लेस्टेस' याच्या वर्णनात कल्याण, सोपारा, चेऊळ ही कोकणातील बंदरे भरभराटीस आल्याचे सांगितले आहे. ७ व्या व ८ व्या शतकापासून अरब व्यापा-यांचा कोकणाशी संपर्क चालू झाला. कोकणी बंदरांचा, पर्शियन आखातातील बंदरांशी व्यापार चालू झाला. त्याचे महत्वाचे कारण इस्लामचा उदय व प्रसार होता. तसेच इस्लामचा शहरीकरणाकडे व व्यापाराकडे अधिक कल होता. अरबी प्रवास वृत्तांतात ठाण्याजवळचे सिंदान किंवा संजान आणि खंबायत (कच्छ), सोपारा आणि चेऊळ यांच्यामध्ये नियमित रित्या वाहतूक असल्याचा उल्लेख आहे.

८ व्या शतकाच्या दरम्यान पर्शियाचे आखात आणि चिनमधील कैंटन बंदर यांच्यामध्ये थेट व्यापारी वाहतूक होत असे. पण नंतरच्या काळात अशा थेट सफरी करण्यापेक्षा टप्प्या टप्याने प्रवास करण्याची पद्धत सुरु झाली. त्यामुळे या व्यापारात कोकण व भारताच्या किनारपट्टीवरील इतर बंदरांचे महत्व वाढले. अल्मसुदीने कोकणाच्या बंदरांचे महत्व स्पष्ट केले आहे. इ.स. ९१५-१६ मध्यें त्याने स्वतः कोकणाला भेट दिली होती. त्यामुळे त्याच्या वर्णनाला महत्व आहे. सिमुर किंवा चेऊळ या कोकणाच्या बंदरात दहा हजार बयासीर मुस्लिम असल्याचा तो उल्लेख करतो. चौळमध्यें सिराफ, उमान, बसरा आणि बगदाद येथील व्यापारी रहात असल्याचे उल्लेख तो करतो. सुलेमान (इ. स. ८५१), अबुसईत (इ.स. ९१६), इन्वखुर्दाबत (इ.स. ९१२), अल्इस्तकरी (इ.स. ९५१), इब्नहबकाल

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

(इ.स. ९६३ ते ९६८) या बरबी प्रवाशांच्या वृत्तांतात कोकणचा कमकम, कम्कार,



माकमकम असे उल्लेख सापडतात; व या प्रवास वृत्तांतात कोकणात अरबी व्यापारी कार्यरत असल्याचे नमुद करण्यात आले आहे. यानंतर कोकणातील कांही भागावर कलचुरींचा अंमल चालू होता. ८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र राष्ट्रकुटांनी दक्षिण कोकण जिंकून घेऊन तेथे आपले. मांडलिक शिलाहार, यांची नेमणूक केली. महाराष्ट्रात शिलाहार राजवंशाच्या तीन शाखा निर्माण झाल्या. त्यापैकी दोन शाखा पश्चिम किनारपट्टीवर होत्या. १) उत्तर कोकणातील शिलाहार यांच्या ताब्यात मुंबई, ठाणे, रायगड होते. २) दक्षिण कोकणातील शिलाहार यांच्या ताब्यात रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि गोवा हे प्रदेश होते. उत्तर कोकण व कोल्हापूरचे शिलाहार तगरपूर-(उस्मानाबाद) आपले मुळस्थान मानतात. 'तगरपूरवराधीश्वर' हे बिरुद लावतात. १८ शिलाहारांच्या दुस-या घराण्याने इ.स. ७६५ ते १०२० पर्यंत राज्य केले. शिलाहार वंशीय 'सनफुल' हा राष्ट्रकुटांचा मांडलिक म्हणून दक्षिण कोकणावर राज्य करीत होता. त्याच्या वंशजांनी इ.स. ७६५ पासून इ.स. १०२४

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

पर्यंत सिंहल प्रदेशावर म्हणजे गोवा प्रदेशावर राज्य केले. सनफुलचा पुत्र धमियारयाने समुद्र किना-यानजिक 'बलीपतन नगर स्थापून आपली राजधानी केली. हे बलिपतन म्हणजे सद्य:चे खारेपाटण होय. वा घराण्यात ऐय्यपराज, प्रथम अवसर, अदित्यवर्मन द्वितिय अवसर, इंद्रराज, भीम, तृतीय अवसर, रट्ट राज असे राजे होऊन गेले.

अशा रितीने दक्षिण कोकणच्या शिलाहारांनी इ.स. ७६५ ते १०२४ पर्यंत

सुमारे २५० वर्षे राज्य केले कांही वेळा त्यांनी उत्तर कोकणातील चौल आणि गोव्यातील चंद्रपूर हे प्रदेश जिंकून आपल्या राज्याचा विस्तार केला. राष्ट्रकुटांचे एकनिष्ठ मांडलिक म्हणून त्यांनी राज्याचा उपभोग घेतला. परंतु कल्याणच्या चालुक्यांविरुध्दच्या त्यांच्या बंडखोर वृत्तीमुळे शेवटी त्यांना आपले राज्य गमवावे लागले. जयसिंह चालुक्याने त्यानंतर कांही काळ कोल्हापूरच्या शिलाहारांकडे दक्षिण कोकणचे शासन सोपविले होते. पण पुढे तो प्रदेश गोव्याच्या कदंबांच्या स्वाधीन करण्यात आला. कारण गोव्याचे कदंब हे चालुक्य, सहावा विक्रमादित्य याचे सोयरे होते. यापुढील काळात दक्षिण कोकण किंवा कोकण ९०० हा प्रदेश वंशपरंपरेने गोव्याच्या कदंबाकडे राहिला "

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

## संदर्भ :


- खोबरेकर व्ही. जी. (संपा.) 'रेकॉर्डस् ऑफ शिवाजीज् पिरियड', व्हॉ. १.
- गर्गे एस्.एम्. "करवीर रियासतीची कागदपत्रे", भाग ४, पुणे १९८२.
- गुजर एम्. व्ही. (संपा.) "करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने".
- ओतुरकर रा. वि. (संपा.) 'पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (१७२२ - १८५४)', पुणे, १९५०.
- ऐतिहासिक साधने", महाराष्ट्र शासन, १९६०.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964





Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र

मी आकाश कुंडलिक मांग विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प **मराठा कालीन कोकण (इ.स. १६५६ ते १८१८)** हा मी स्वतः क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे. पूर्वी सदर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही .

दिनांक:31/5/ २०२२

ठिकाण : कोल्हापूर

आकाश कुंडलिक मांग

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की , विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असलेला विद्यार्थी **आकाश कुंडलिक मांग** सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प **मराठा कालीन कोकण (इ.स. १६५६ ते १८१८)** हा या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेला असून , आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

**दिनांक:** १९/५/२०२२

**ठिकाण:** कोल्हापूर

डॉ. एस . आर. कट्टीमनी
विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

प्रा.अश्विनी खवळे

प्रा. नम्रता ढाळे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ★ (Autonomous) ★ ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner